**<u>नियमित दिवाणी दावा क्र.१४३/२०२० मधील निशाणी १६१ खालील आदेश</u>**

वादीने प्रस्तुतचा अर्ज वादी क्र.१ब दिलीप आण्णा लोंढे यांचे वारस अभिलेखावर आणणेस विलंब झालेने आपोआप झालेला उपशम रद्द होवून मिळणेकरिता दाखल केलेला आहे.

(२) वादीने प्रस्तुतचा दावा प्रतिवादींविरुध्द दावा मिळकतींचे सरस निरस मानाने वाटप होवून वादींचा १/३ हिस्सा अलग व पृथक होवून मिळणेसाठी दाखल केलेला आहे. प्रस्तुत अर्जान्वये वादीचे असे कथन आहे की, सदर दाव्यातील वादी क्र.१ब दिलीप आण्णा लोंढे हे दि. १८/०८/२०२० रोजी मयत झालेले आहेत. वादी यांना वादी अथवा प्रतिवादी मयत झाल्यावर वारस रेकॉर्डवर आणावे लागतात या कायदेशीर बाबीची माहिती नसलेने व वादी क्र.१ब दिलीप आण्णा लोंढे हे मयत असलेची कल्पना आलेली नव्हती व त्यांचे मृत्येचा उतारा मिळाला नसलेमुळे वारस रेकॉर्डवर घेणेस विलंब झाला आहे. वादीने मुद्दाम जाणूनबुजून वारस कळविणेस विलंब केला नाही. सदरहू दाव्यातील मयत वादी क्र.१ब दिलीप आण्णा लोंढे यांचे वारस दाखल करणेस वादीस झालेला विलंब माफ करणेत येवुन तांत्रिकदृष्ट्या झालेला अबेटमेंटचा हुकूम सेटअसाईड होवून मिळणेची विनंती केलेली आहे.

(३) प्रतिवादींनी प्रस्तूत अर्जावरच म्हणणे दाखल करुन असे कथन केले आहे की, वादीचा अर्ज व अर्जातील मजकूर मान्य नाही, कबूल नाही. वादी नं. १ब चे वारस मुदतीत रेकॉर्डवर न आणलेने वादीचा दावा अबेट होत आहे. सबब सदरचा अर्ज रद्द करणेत यावा. तसेच सदरचा अर्ज मंजूर करणेचा झालेस वादीस हेवी कॉस्ट करावी व ती प्रतिवादींना मिळावी. अशी विनंती प्रतिवादी तर्फे करणेत आली आहे.

(४) निशाणी १६१ कडील अर्ज, त्यावरील म्हणणे व त्या पुष्ट्यर्थ दाखल केलेले प्रतिज्ञापत्र यांचे अवलोकन केले. वादी व प्रतिवादींतर्फे विद्वान विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला. वादीने प्रस्तुत अर्जान्वये वादी क्र.१ब दिलीप आण्णा लोंढे यांचे वारस अभिलेखावर घेणेस विलंब झालेने त्यांचे विरुध्दचा दावा उपशम रद्द होवून मिळणेबाबत विनंती केलेली आहे. वादीचे असे कथन आहे की, वादी क्र.१ब दिलीप आण्णा लोंढे हे दि. १८/०८/२०२० रोजी मयत झालेबाबतची माहिती वादी यांना वेळेत मिळालेली नसलेने त्यांचे वारस मुदतीत रेकॉर्डला घेता आले नाहीत. प्रस्तुत दावा हा वाटपाचा दाखल केला आहे. तसेच दाव्याचा गुणदोषांवर निपटारा होणेकरिता तसेच फलित व परिणामकारक हुकूमनामा होणेकरिता प्रस्तुतचा अर्ज मंजूर करणे न्यायोचित ठरते. वादीचा निशाणी १५९ कडील विलंब माफीचा अर्ज मंजूर केलेला आहे. दाव्याचे स्वरुप विचारात घेता न्यायहिताच्या दृष्टीने प्रस्तुतचा अर्ज मंजूर करणे न्यायोचित ठरते. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## <u>आदेश</u>

निशाणी १६१ कडील अर्ज वादीने प्रतिवादींना र.रु.५००/- खर्च देणेचे अटीवर मंजूर करण्यात येत आहे.

Sd/-
(श्रीमती अ. ब. सोनटक्के)
दुसरे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
विटा. जि. सांगली.

विटा.
दिनांकः-१२.०३.२०२४.

RCS No. 143/2020
CRN No. MHSN150043432020 (Anna Barsing Vs Jaywant Barsing)

## CERTIFICATE

I affirm that the contents of this PDF file are same as per the original.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | D.S.Kadam, Jr.Clerk |
| Name of the Court | :- | Smt. A. B. Sontakke,<br>$2^{nd}$ Jt.Civil Judge Jr. Dn., & J.M.F.C.,<br>Vita. Tal:-Khanapur. |
| Date of decision | :- | 12.03.2024 |
| Order signed by P.O. on | :- | 12.03.2024 |
| Order uploaded on | :- | 12.03.2024 |